PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 6, ISSUE 2

# संस्कृत साहित्यामधील मानव आणि वनस्पती जीवनातील साम्य

**सौ. वर्षा सुनील नाईक**
संस्कृत विभाग
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
**महाराष्ट्र भारत**

## नमो वृक्षेभ्यः।

संस्कृत वाङमयामध्ये वृक्षवल्लींविषयक वर्णन अनेक ठिकाणी पहावयास मिळते. प्राचीन काळी अनेक विचारवंतांनी सृष्टीचे सूक्ष्म निरीक्षण आणि संशोधन करून तसेच अंतःप्रेरणेद्वारे तर्कनिष्ठ असे निष्कर्ष काढले. हे निष्कर्ष म्हणजे सृष्टी विज्ञानाचा पाया होय. या विज्ञानामध्ये अनेक वनस्पतींचा विचार प्रकट केला आहे. त्यांचे धार्मिकदृष्ट्या महत्त्व दर्शविलेले आहे. तसेच मानवी जीवनाशी वृक्षजीवनाची समानता दर्शविलेली आहे.

मानवी जीवनाचा निसर्गाशी अगदी घनिष्ठ संबंध आहे. निसर्गामध्ये जलाशय, वाळवंटे, पर्वत, नद्या, अरण्य यांचा समावेश प्रामुख्याने होतो. यातील अरण्ये ही अनेक प्रकारच्या वृक्ष, वेली, वनस्पतींनी नटलेली आहेत. यावर मानवी जीवन प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या अवलंबून असते. मानवाने आपल्या उदरनिर्वाहासाठी अरण्यातील वृक्ष, वेली, वनस्पतींचा उपयोग करून अन्न, वस्त्र आणि निवारा या मुलभूत गोष्टी मिळविल्या. याचबरोबर त्याला जीवन देणारी शुद्ध हवा ही या अरण्यातूनच मिळते. अशा वृक्षवल्लिंद्वारे विविधतेने नटलेल्या तसेच त्याला पूरक अशा अनेक गोष्टींनी सजलेल्या या सृष्टीचे अवलोकन प्राचीन काळी अनेक विचारवंतानी केले. याविषयी चिंतन आणि मनन करून त्यावर आधारित असे वनस्पतीशास्त्र निर्माण केले. या वनस्पतीशास्त्रातूनच कृषकशास्त्र, वैद्यकशास्त्र, जीवशास्त्र या सारख्या अनेक शास्त्रांच्या शाखा उदयास आल्या आहेत. यामुळे हे वनस्पतीशास्त्र अनेक शास्त्राचे मूळ आणि आधार स्तंभ झालेले आहे. याचा उगम वेदवाङमयामध्ये पहावयास मिळतो. या वृक्षशास्त्राविषयी शास्त्रशुद्ध आणि आधारभूत असा **वृक्षायुर्वेद** नावाचा महर्षि वराहमिहीरांनी रचलेला ग्रंथ आज पहावयास मिळतो. यामध्ये वर्णिलेले विषय हेही तितकेच शास्त्राधारित आहेत. असे असले तरी या शास्त्राची पाळेमुळे ही वैदिक वाङमयामध्येच पहावयास मिळतात.

वृक्ष जीवन तसेच मानवी जीवन यामध्ये अनेक प्रकारचे साम्य आपणास पहावयास मिळते. संस्कृत वाङमयामध्ये याबद्दल अनेक ठिकाणी वर्णन आढळते. बृहदारण्यक उपनिषदामध्ये याज्ञवल्क्य ऋषींनी जनकराजाच्या सभेमध्ये ब्राह्मणांना तत्त्वज्ञान सांगताना मानव आणि वृक्ष यांच्यात असलेल्या दृढ संबंधाबद्दल विवेचन केलेले आढळते. वृक्ष आणि मानव यांच्या शारीरिक रचनेत असलेले साम्य त्यांनी पुढील सूत्रामध्ये स्पष्ट केलेले आहे.

**यथा वृक्षो वनस्पतिः तथैव पुरूषो मृषा। तस्य लोमानि पर्णानि त्वगस्य उत्पाटिका बहिः।।**
**त्वच एवास्य रुधिरं प्रस्यन्दि त्वच उत्पटः। तस्मात्तृण्णात् प्रैति रसो वृक्षादिवाहतात्।।**
**मांसान्यस्य शकराणि किनाटं स्नाव तत्स्थिरम्। अस्थीनि अन्तरतो दारूणि मज्जा मज्जोपमा कृता।।**
**बृहदारण्यकोपनिषद ३/९/१-३।।**

जसे वृक्ष, वनस्पती तसेच मानव आहेत. जसे मानवाचे केस तशी वृक्षांची पाने होय. मानवाच्या त्वचेप्रमाणेच वृक्षांची साल आहे. जखमी मानवाच्या त्वचेमधून जसे रक्त येते तसेच वृक्षांवर आघात झाल्यास त्याच्या सालीतून चीक वाहतो. मानवामधील मांस तसे वृक्षांमध्ये अंतर्साल. मानवामध्ये शिरांचे जाळे असते तर वृक्षांच्या अंतर्सालीच्या आत घट्ट धरून राहिलेली पातळ साल असते. मानवामध्ये हाडे असतात त्याचप्रमाणे वृक्षांमध्ये घट्ट लाकूड असते. मानवामध्ये जशी मज्जासंस्था असते तशीच ती वृक्षांमध्येही असते. अशी ही शारीरिक जडण-घडण मानव आणि वृक्ष यांच्यात समान असलेली आढळते.

संस्कृत भाषेतील ग्रंथशिरोमणि **श्रीमद्भगवद्गीतेमध्ये** १२ व्या अध्यायामधील पहिल्या श्लोकामध्ये **ऊर्ध्वमूलमधशाखाम्** या श्लोकामध्ये श्रीकृष्णाने संपूर्ण ब्रह्मांडाला अश्वत्थाची उपमा दिली आहे. तसेच प्राचीन चतुर्वेदांना या वृक्षांची पाने मानले आहे. याविषयी सांगताना भगवंत म्हणतात की, जसा पर्णयुक्त वृक्ष शोभायमान होतो तसे वेदज्ञान जे संसाराला दैदिप्यमान करते. यावरून वृक्षमहती लक्षात येते.

याशिवाय आयुर्वेदाशीही वनस्पतीशास्त्र किती जवळचे आहे हे अनेक संस्कृत ग्रंथातून पहावयास मिळते. **औषधीनां पतये नमः। अरण्यानां पतये नमः। नमः वन्याय च।** याच बरोबर **ऋग्वेदातील** एका सूक्तामध्ये वनदेवतेला संपूर्ण प्राणिमात्रांची माता असे वर्णन केलेले आहे. अशी अनेक उदाहरणे सर्वत्र विखुरलेली आहेत.

मानवी जीवनामध्ये जसा सुखदुःखांचा अनुभव येतो तसेच वृक्षही सुखदुःखांच्या संवेदनांचा अनुभव घेतात.

**सुखदुःखयोश्च ग्रहणाच्छिन्नस्य च विरोहणात्।**
**जीवं पश्यामि वृक्षाणामचैतन्यं न विद्यते।।**
**महाभारत शान्तिपर्व १८४।।**

वृक्ष कापले असताही त्याला नवा अंकुर येतो आणि ते वाढतात. तसेच ते सुखदुःख म्हणजेच संवेदना ग्रहण करतात. यावरून वृक्षांना जीवन आहे आणि ते चैतन्ययुक्त आहेत हे सिद्ध होते. आजही विज्ञानाने असे सिद्ध केले आहे कि वृक्षांजवळ मधुर संगीत लावले असता त्यांची वाढ जोमाने होते. तर काही आदिवासी प्रदेशामध्ये एखादे झाड पाडावयाचे असले तर त्याभोवती जमून त्याला अपशब्द बोलतात. त्यामुळे काही दिवसातच तेथील झाड सुकून मरते. यावरून असे सिद्ध होते की त्यांनाही संवेदना आहेत. तसेच त्यांना चेतनादेखील आहे त्यामुळे त्यांना हर्ष आणि शोक होतात. तसेच ते वृक्ष पवित्र आणि अपवित्र गंधामुळे फुलू शकतात. तसेच अनेक धुपांमुळे झाडे निरोगी होऊन त्यांना फुलांचा बहर येतो.

**ऊष्मतो ग्लानपर्णानां त्वक् पुष्पमेव च।**
**म्लायते चैव शीतेन स्पर्शस्तेनात्र विद्यते।।**

**महाभारत, मोक्षपर्व, १२.११।।**

उष्णतेमुळे किंवा थंडीमुळे वृक्षांची साले, पाने, फळे, फुले म्लान आणि ग्लान होतात. यावरून असे ज्ञात होते की, पर्यावरणातील बदलांचा परिणाम जसा मानवावर होतो तसाच तो वृक्षजीवनावरही होतो.

मानवाच्या सुखसमृद्धीमध्ये निसर्गाचे अतिशय महत्त्व आहे. यामुळे भारतीय संस्कृती संपूर्ण मानव जातीला पशु, पक्षी, सृष्टी तसेच वनस्पती यांच्यावर प्रेम करायला शिकवते. म्हणूनच प्राचीन संस्कृत वाङ्मयामध्ये वृक्षांचा धार्मिकदृष्ट्या विचार केला आहे. या वृक्षांचे महत्त्व पुत्राप्रमाणे मानले आहे. जसे मानवी जीवनामध्ये पुत्राचे स्थान असते तसेच वृक्षांचेही असते. मानव आपल्या वंशवृद्धीसाठी पुत्रजन्म, त्याचे लालन, पालन आणि संगोपन करतो, त्याचप्रमाणे पर्यावरण संतुलनासाठी वृक्षाची लागवड, तसेच त्यांचे रक्षण, संवर्धन, पोषण आवश्यक असते. याशिवाय जीवनदात्री पृथ्वीचे महत्त्व प्रतिपादित करताना, सर्वप्राणीमात्राच्या कल्याणाची भावना **वसुधैव कुटुम्बकम्** अशी व्यक्त केलेली सर्वत्र पहावयास मिळते. **पृथ्वीला जगत्जननी असे ही मानले आहे.** अथर्ववेदामध्ये असे प्रतिपादित केले आहे की, सर्व प्राणिमात्र आणि अन्य चराचर हे पृथ्वीचे पुत्रच आहेत, म्हणजेच मानव आणि वृक्ष यांचे महत्त्व समानच आहे.

**माता भूमिः पुत्रोऽहं पृथिव्याः।** **अथर्ववेद १२.१, पृथ्वीसूक्त।।**
**वृक्षदं पुत्रवत् वृक्षास्तारयन्ति परत्र तु।**
**तस्माद् तडागे सद्वृक्षा रोप्याः श्रेयोऽर्थिना सदा।। महाभारत अनुशासन पर्व ५८.३१।।**

वृक्ष हे पुत्रांप्रमाणेच असतात. ते मानवाला या लोकातून परलोकामध्ये नेतात. तसेच एक सुपुत्र जसा संपूर्ण कुलाचा उद्धार करतो तसाच एखादा सुगंधी वृक्ष लावला असता तो साऱ्या अरण्याला सुगंधित करतो. म्हणून वृक्षांचे पालन, रक्षण आणि संवर्धन पुत्राप्रमाणे करावे. तसेच वड, पिंपळ, चिंच, आवळा, कवट यासारख्या बहुगुणी वृक्षांची लागवड तसेच संवर्धन करावे. यामुळे नरक जीवन कधीही प्राप्त होत नाही. जरी हे वर्णन पारलौकिकदृष्ट्या असले तरी त्यांच्या गुणांचे अध्ययन अतिशय

सखोल केलेले होते. अश्वत्थाचे गुण आणि उपयुक्तता यांचे अध्ययन करून त्यात वृक्षसृष्टीचे महत्त्व दर्शविलेले आहे. अशा प्रकारचे अनेक दाखले प्राचीन संस्कृत साहित्यामध्ये पहावयास मिळतात.

कालिदास रचित साहित्यामध्ये सर्वत्र वृक्षवल्लींचे वर्णन आढळते. **रघुवंश** या महाकाव्यामध्ये महर्षी वरतंतूचा शिष्य कौत्स्य गुरूदक्षिणा देण्यास उत्सुक असतो. जेव्हा तो कौत्स्य निष्कांचन अशा रघुराजांजवळ गुरूदक्षिणेसाठी याचना करण्यासाठी येतो, तेव्हा रघुराजा आश्रमामधील वृक्षांचे क्षेमकुशल विचारतात. यावरून त्या पृथ्वीपती रघुराजाच्या कर्तव्यनिष्ठेचे प्रमाण पहावयास मिळते. याचबरोबर दातृत्त्व प्रकट होते.

**आधारबन्धुप्रमुखैः प्रयत्नैः संवर्धितानां सुतनिर्विशेषम्।**
**कच्चिन्न वाच्वादिरूपप्लवो वः श्रमच्छिदामाश्रमपादपानाम्।।**
**रघुवंश १३.२२।।**

आश्रमामधील कुंपणस्वरूप असलेल्या वृक्षांचे संवर्धन पुत्रांप्रमाणे केले आहे ना? तसेच त्या वृक्षाद्वारे वाटसरूंना आसरा मिळतो का? याशिवाय वादळ किंवा अतिवृष्टी याद्वारे वृक्षांची हानी झाली नाही ना?

असे हे वृक्ष मानवाबरोबरच त्यांच्या संस्कृतीशी अतिशय निगडित आहेत. तसेच आर्थिक प्रगती, औषधिविज्ञान, अन्नपान, वस्त्र यासारख्या अनेक क्षेत्रामध्ये यांचे योगदान अत्यंत उल्लेखनीय आहे. त्यामुळे त्यांच्या संरक्षणामध्ये तसेच विकासामध्येच मानवाचे हित दडलेले आहे. पर्यावरणाच्या शुद्धीमध्येही याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. यामुळे सुभाषितांमध्ये या प्रकारचे अनेक उल्लेख पहावयास मिळतात.

मानवाच्या जीवनामध्ये सदाचार बाणावा यासाठी त्याच्या प्रत्येक कृतीला धर्माची जोड दिली गेली. यामुळे मानवाने नैतिकतेचा विचार सतत केला. याविषयी देखील वृक्षजीवन किती उपयुक्त आहे याचे ही वर्णन प्राचीन वाङमयामध्ये पहावयास मिळते. जीवनामध्ये परोपकाराला अत्यंत महत्त्व आहे. यासाठी साधू, संत, सज्जन यांच्या आचरण पद्धतीसारखीच वृक्षांची जीवनपद्धती असते. यांचे वर्णन संस्कृत वाङमयामध्ये सर्वत्र विखुरलेले पहावयास मिळते.

**सेवितव्यो महावृक्षः फलच्छायासमन्वितः। परोपकाराय फलन्ति वृक्षाः।**
**आयुर्बलं यशो वर्चः प्रजाः पशून् वसूनि च। ब्रह्म प्रज्ञां च मेधां च त्वं नो देहि वनस्पते।।**
**सुभाषित रत्नभांडार।।**

परोपकारी वृक्षवल्लींबरोबर प्राचीन काळी आत्मीय संबंध जोडले जाऊन त्यांचे दैनंदिन जीवनामध्ये पूजनही केले जात असे. त्यांच्याकडे आयुष्य, यश, बळ, तेज, कीर्ति, वैभव तसेच बुद्धिची मागणी केली जात असे.

गुरूप्रमाणे श्रेष्ठ असलेल्या वृक्षांचे माहात्म्य जाणून पं. जगन्नाथ पंडितांनी त्याविषयी वर्णन केले आहे. याचबरोबर मानव जीवनामध्ये पाच यज्ञांचे महत्त्व आहे. यामध्ये देवयज्ञ, पितृयज्ञ, भूतयज्ञ, मनुष्ययज्ञ, ब्रह्मयज्ञ यांचा समावेश होतो. यामुळे मानव देव, पिता, पशू, मनुष्य, समाज आणि गुरू यांच्या ऋणातून मुक्त होतो. यामधून दानाची भावना प्रकट होते. त्याचप्रमाणे वृक्ष ही आपले सर्वस्व अर्पण करून गृहस्थासाठी इन्धन, वाटसरूंसाठी छाया, विश्रांतीचे स्थान प्राण्यांना आसरा आणि पक्ष्यांना निवारा देऊन त्यांच्यावर उपकार करत असतात.

याचबरोबर विषयुक्त वृक्षांचेही संरक्षण करावे असे वर्णन पहावयास मिळते.

वृक्षांचे जीवनामध्ये असलेले अनन्यसाधारण महत्त्व प्राचीन काळी ज्ञात होते. त्यामुळे सहसा छेदन केले जात नसे. याउलट जर वृक्षांचे छेदन केले तर प्रकृतीचा ऱ्हास होतो. अतिवृष्टी, अकाल, दुष्काळ निर्माण होतो. यामुळे मानवी जीवन दुःखी होते.

**विषवृक्षोऽपि संवर्ध्य स्वयं छेत्तुं साम्प्रतम्।** **सुभाषित रत्नभांडार।।**

संस्कृत वाङमयामधील कविश्रेष्ठ कालिदासांनी आपल्या काव्यामध्ये विषयुक्त वृक्षांचे छेदन करू नये असे सांगितले आहे. प्राचीन ऋषिमुनींनी वृक्षवल्लींचे निरीक्षण आणि चिंतन करून वनस्पतिशास्त्राचा पाया रचला. आजचे वनस्पतिशास्त्र कितीही प्रगत असले तरी त्याची प्राचीनता वेदवाङमयातून प्रकट होते. याचबरोबर त्यांचे धार्मिक महत्त्व, परोपकार अशा अनेक प्रेरणादायी विचारांचेही विवेचन पहावयास मिळते. मानवी जीवनाशी साम्यही दर्शविलेले आहे. असे हे वृक्ष सर्वप्राणिमात्राला जीवन प्रदान करणारे आहेत त्यामुळे त्यांचे जीवन हे सर्वोत्कृष्ट जीवन आहे. अशा या गुरूप्रमाणे श्रेष्ठ, परोपकारी आणि जीवनदायी वृक्षांना शतशतकोटी प्रणाम असो.

**तस्मै वदान्यगुरवे तरवे नमोऽस्तु।।**

## ग्रंथ सूची :


- **बृहदारण्यकोपनिषद,** गीताप्रेस, गोरखपुर.
- **महाभारत,** गीताप्रेस, गोरखपुर.
- **प्राचीन भारतीय ज्ञान-विज्ञान,** प्रा. वि. म. बेडेकर, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे.
- **संस्कृत साहित्ये वनस्पतिजीवदर्शनम्,** धनञ्जय वासुदेव द्विवेदी.